| | |
|---|---|
| | **दिवाणी किरकोळ अर्ज ३०/२०२६**<br>**योजना अशोक पाटील वगैरे**<br>**वि.**<br>**कोणीही नाही.** |

**निशाण १ खाली आदेश पारीत**

१. अर्जदार क्र. १ ते ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठी केला आहे.

**अर्जदार क्र. १ ते ५ यांची अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे**

२. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र. १ ते ५ यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ अन्वये वारसा दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ५ यांचे म्हणणे असे की, अर्जदार हे कलम १ मधील नमूद पत्यावरील कायम रहिवासी आहेत. अर्जदार क्र. १ ते ५ हे नात्याने सख्खे भाऊ व बहीण आहेत. सदर अर्जदार क्र. १ ते ५ यांची आत्ती तानुबाई यशवंत पाटील या दि. ०१.०९.२००४ रोजी राहते घरी म्हणजेच केखले ता. पन्हाळा या गावी अविवाहीत मयत झालेल्या असून त्यांचे पश्चात त्यांना कायदेशीर वारसदार म्हणून त्यानंतर त्यांचे सख्खे भाऊ रामराव यशवंत पाटील हे देखील दि. १४.०९.२०१९ रोजी राहत घरी मयत झालेले आहेत. तसेच त्यांची पत्नी शालाबाई रामराव पाटील या देखील दि. ०१.०१.१९९१ रोजी राहत्या घरी मयत झालेल्या आहेत. तसेच अर्जदार क्र. १ ते ५ यांचे आई वडील म्हणजेच रामराव यशवंत पाटील व शालाबाई रामराव पाटील हे सन २०१९ साली व सन १९९१ साली मयत झालेले होते. सदर त्यांचे मृत्यूपश्चात अर्जदार क्र. १ ते ५ यांचे वडील तसेच त्यांची सख्खी बहीण तानुबाई यशवंत पाटील या दि. ०१.०९.२००४ रोजी अविवाहीत म्हणून मयत झालेल्या आहेत. तसेच सदर कै. तानुबाई यशवंत पाटील, कै. रामराव यशवंत पाटील, कै. शालाबाई रामराव पाटील यांना अर्जदार क्र. १ ते ५ हे कायदेशीर सरळ वारसदार होते व आहेत. तसेच सदर रामराव यशवंत पाटील यांची सख्खी बहीण तानुबाई यशवंत पाटील या सुरुवातीपासून अविवाहीत आहेत. त्यांचा कधीही विवाह

झालेला नव्हता व नाही. तसेच त्यांना कोणतेही कायदेशीर सरळ वारसदार कधीही नव्हते व नाहीत. तसेच सदर तानुबाई यशवंत पाटील या अविवाहीत म्हणून दि. ०१.०९.२००४ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर सर्व अंतिम विधी हा त्यांचे भाऊ रामराव यशवंत पाटील हे वयस्क असल्यामुळे अर्जदार नं. २ यांनीच पूर्ण केलेला होता व आहे. तसेच मयत कै. तानुबाई यशवंत पाटील या मृत्यूसमयी निपुत्रीक म्हणून मयत झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे मृत्यूच्या अगोदर त्यांचा सांभाळ पालन पोषण औषधउपचार हा देखील अर्जदार क्र. १ ते ५ यांनीच केले होते व आहे. तसेच सदर मयत कै. तानुबाई यशवंत पाटील यांचे मृत्यूपश्चात त्यांचा मृत्यूनंतरचा सर्व धार्मिक कार्यविधी या अर्जदार क्र. १ ते ५ यांनीच पूर्ण केलेला होता व आहेत. तसेच मयत कै. तानुबाई यशवंत पाटील यांचे त्यांच्या आई वडिलांचे पश्चात मयत रामराव यशवंत पाटील व अर्जदार क्र. १ ते ५ यांनी सांभाळ पालन पोषण करत होते. तसेच अर्जदार क्र. १ ते ५ हेच त्यांचे आधार होते व आहेत. तसेच सदर अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर सरळ वारसदार नसून ते अर्जदार क्र. १ ते ५ हेच आहेत. तसेच सदर कै. तानुबाई यशवंत पाटील, कै. रामराव यशवंत पाटील व कै. शालाबाई रामराव पाटील यांचे मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारसदार म्हणून लागणाऱ्या शासकीय व निमशासकीय या ठिकाणी तसेच इतर अन्य कार्यालयामध्ये कायदेशीर वारसदार कळविलेले असल्यामुळे सदर वारसा प्रमाणपत्र मिळणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच कै. तानुबाई यशवंत पाटील, कै. रामराव यशवंत पाटील व कै. शालाबाई रामराव पाटील हे मयत झाले असून अर्जदार क्र. १ ते ५ हे कै. तानुबाई यशवंत पाटील यांचे सख्खा भाचा व भाची असल्याने त्यांना अर्जदार हेच सरळ वारसदार असून त्यांचे शिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नव्हते व नाहीत. तसेच कै. तानुबाई यशवंत पाटील यांनी त्यांचे हयातीमध्ये कधीही कोणतेही मृत्यूपत्र केलेले नाही. तसेच वारसाबाबत कोणताही वाद विवाद तक्रार दाखल अगर प्रलंबित नाही.

३. अर्जदार यांनी दैनिक नवसंदेश वृत्तपत्रात जाहीर नोटीस देवून तसेच जाहीरनामा प्रसिद्ध करुन देखील आज अखेर सदर अर्जास कोणीही हरकतदार कोर्टासमोर हजर झालेला

नाही.

४. अर्जदार यांचा अर्ज, कागदपत्रे, प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. अर्जदार तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वरील सर्व बाबींचा विचार करता खालील प्रमाणे मुद्दे निर्णयार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसे सहित मी खालील प्रमाणे नोंदविले आहेत.

| अनु क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वारसा दाखला मिळविणेस अर्जदार क्र. १ ते ५ हे पात्र व हक्कदार आहेत का ? | **होय.** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ :-**

५. अर्जदारांतर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार यांनी दैनिक नवसंदेश या वृत्तपत्रात जाहीर नोटीस देवून तसेच जाहीरनामा प्रसिद्ध करुन देखील आज अखेर सदर अर्जास कोणीही हरकत घेतलेली नाही अगर अर्जदार यांना वारस दाखला देणेस कोणीही विरोध दर्शविलेला नाही. तसेच अर्जदार क्र. १ ते ५ यांनी या अर्जाचे पृष्ठयर्थ अर्जदार क्र. २ यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि.१२** येथे दाखल केले आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ५ तर्फे साक्षीदार क्र. १ संदीप पाटील व साक्षीदार क्र. २ संतोष पाटील यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि.१० व नि.११** येथे दाखल केले आहे. सबब त्यांनी सदरचा अर्ज मंजूर करणेविषयी विनंती केली.

६. प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दैनिक नवसंदेश या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस **(नि.१३ )** प्रसिद्ध करुन देखील या कामी कोणीही न्यायालयासमोर हजर होवून अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज व अर्जदार क्र. १ ते ५ यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रास हरकत घेतलेली नाही. अर्जदार क्र.१ ते ५

यांनी त्यांचे अर्जाचे पृष्ठर्थ मयत तानुबाई यशवंत पाटील यांचे मृत्यू प्रमाणपत्र **(नि.१४)**, तसेच मयत रामराव यशवंत पाटील यांचे मृत्यूप्रमाणपत्र **(नि.१५)**, तसेच मयत शालाबाई रामराव पाटील यांचे मृत्यूप्रमाणपत्र **(नि.१६)** व अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत तानुबाई यशवंत पाटील या दि.०१.०९.२००४ रोजी मयत झालेल्या आहेत. तसेच मयत रामराव यशवंत पाटील हे दि.१४.०९.२०१९ रोजी मयत झालेले आहेत. तसेच मयत शालाबाई रामराव पाटील या दि.०१.०१.१९९१ रोजी मयत झालेल्या आहेत. तसेच अर्जदार क्र. १ ते ५ यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही हजर होवून आपण मयत तानुबाई यशवंत पाटील यांचे वारस आहोत असे न्यायालयासमोर सादर केलेले नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ५ यांचे व्यतिरिक्त मयत तानुबाई यशवंत पाटील यांचे अन्य कोणीही वारस नाहीत. तसेच तानुबाई यशवंत पाटील या मयत झाल्यामुळे अर्जदार क्र. १ ते ५ हे तानुबाई पाटील यांचे वारस असलेने ते वारस दाखला मिळविणेस पात्र व हक्कदार आहेत.

७. तसेच अर्जदार क्र. १ ते ५ यांनी दाखल केलेला अर्ज, अर्जदार क्र. १ ते ५ यांचे प्रतिज्ञापत्र व त्यांचे तर्फे साक्षीदार यांचे प्रतिज्ञापत्र व अभिलेखावर दाखल कागदपत्रे तसेच वर नमूद कारणमिमांसा यांचा एकत्रीतरित्या विचार केला असता सदरचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त व न्यायोचित होईल. त्याप्रमाणे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देवून मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष देणेकरीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१. अर्जदार क्र. १ ते ५ यांचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.**

**२. बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम ८ अन्वये अर्जदार क्र. १ ते ५ यांचे नावे वारस दाखला देणेत यावा.**

**३. बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ तसेच दिवाणी नियमावली परिच्छेद क्र. ३१२ अन्वये वारस दाखले मध्ये तशी टीप ठेवण्यात यावी.**

18/7/26

दि. १८.०७.२०२६

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.

# खर्चाचा आकडा

किरकोळ दिवाणी अर्ज ३०/२०२६ नि.१ / ब सोबतची पुरवणी

| अ.नं. | तपशिल | अर्जदार | वि. प. कोणी नाही |
|---|---|---|---|
| १ | दावा अर्जास मुद्रांक | ३० | -- |
| २ | वकील पत्रास मुद्रांक | १० | -- |
| ३ | वकील फी | १५० | -- |
| ४ | दाखल केलेल्या कागदास मुद्रांक | ३० | -- |
| ५ | आदेशिका लागू करणेस मुद्रांक | -- | -- |
| ६ | मुदत अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| ७ | जाहिरनामा प्रसिध्द खर्च | १२०० | -- |
| ८ | इतर अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| ९ | कमिशनरची फी | -- | -- |
| | एकूण ... | १४२० | -- |
| | वजा न दिलेला खर्च | | |
| १ | मुदत अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| २ | कोर्ट फी परतावा | -- | -- |
| | एकूण ..... | १४२० | -- |

आज दिनांक १८ माहे जुलै सन २०२६ इसवी रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

CIVIL JUDGE OF PANHALA

18/7/26

क. लिपिक

( के.डी.काकतकर)
सह.दिवाणी न्यायाधीश क. स्तर पन्हाळा

अर्जदार तर्फे वकील – अॅड. पी.एस.पाटील

वि. प. तर्फे वकिल – कोणी नाही

<u>टीप - या वादातील पक्षकारांना अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते परत नेले नाहीत तर अपील झाले असल्यास अपिलाचा निकाल झाल्यावर नाश करुन टाकण्यास पात्र ठरतील)</u>

**CHALLAN**

**MTR Form Number-6**

| **GRN** | MH006666011202627U | **BARCODE** | | **Date** | 18/07/2026-14:39:47 | **Form ID** |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** | District And Sessions Court | **Payer Details** | |
| **Type of Payment** | Service and Service Fees<br>Court fees realised in cash including Amin and Pro | **TAX ID (Case No.)** | DSCTAX01 |
| | | **PAN No.(If Applicable)** | |
| **Office Name** | CIVIL COURT JR DIVISION PANHALA | **Full Name** | Yojna Ashok Patil etc 4 |
| **Location** | KOLHAPUR | | |
| **Year** | 2026-2027 One Time | **Flat/Block No.** | |
| | | **Premises/Building** | |

| **Account Head Details** | **Amount In Rs.** |
|---|---|
| 0070028801 Court Fee | 200.00 |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| **Total** | 200.00 |

| | |
|---|---|
| **Road/Street** | |
| **Area/Locality** | |
| **Town/City/District** | |
| PIN | |
| **Remarks (Party Details)** | MHKO17 |
| **Amount In Words** | Two Hundred Rupees Only |

| **Payment Details** | STATE BANK OF INDIA |
|---|---|
| **Cheque-DD Details** | |
| Cheque/DD No. | |
| Name of Bank | |
| Name of Branch | |

| **FOR USE IN RECEIVING BANK** | | | |
|---|---|---|---|
| Bank CIN | Ref. No. | 00040572026071863550 | CPAGZVXUJ5 |
| Bank Date | RBI Date | 18/07/2026-14:24:40 | Not Verified with RBI |
| Bank-Branch | | STATE BANK OF INDIA | |
| Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID : CMHKO172026663854L

Mobile No. : XXXXXX8343



**Print Date 18-07-2026 02:40:50**

**CHALLAN**

**MTR Form Number-6**

| GRN | MH006666011202627U | BARCODE | | Date | 18/07/2026-14:39:47 | Form ID | |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** | District And Sessions Court | **Payer Details** | |
| **Type of Payment** | Service and Service Fees<br>Court fees realised in cash including Amin and Pro | **TAX ID (Case No.)** | DSCTAX01 |
| | | **PAN No.(If Applicable)** | |
| **Office Name** | CIVIL COURT JR DIVISION PANHALA | **Full Name** | Yojna Ashok Patil etc 4 |
| **Location** | KOLHAPUR | | |
| **Year** | 2026-2027 One Time | **Flat/Block No.** | |
| **Account Head Details** | **Amount In Rs.** | **Premises/Building** | |
| 0070028801 Court Fee | 200.00 | **Road/Street** | |
| | | **Area/Locality** | |
| | | **Town/City/District** | |
| | | PIN | |
| | | **Remarks (Party Details)** | |
| | | MHKO17 | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | **Amount In Words** | Two Hundred Rupees Only |
| **Total** | 200.00 | | |

DEFACED ₹200.00 DEFACED

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Payment Details** | STATE BANK OF INDIA | **FOR USE IN RECEIVING BANK** | | |
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 00040572026071863550 CPAGZVXUJ5 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 18/07/2026-14:24:40 Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | STATE BANK OF INDIA |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll |

Department ID : CMHKO172026663854L

Mobile No. : XXXXXX8343

**Challan Defaced Details**

| Sr. No. | Remarks | Defacement No. | Defacement Date | UserId | Defacement Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | 0003725246202627 | 18/07/2026-14:46:24 | DSC115 | 200.00 |
| | | | **Total Defacement Amount** | | **200.00** |



**Print Date 18-07-2026 02:46:28**

<u>टीप - कोर्ट फी स्टॅंप रु.२००/- जोडला आहे.</u>  अर्जदार तर्फे वकील अॅड. पी.एस.पाटील

## <u>वारसा प्रमाणपत्र</u>

किरकोळ दिवाणी अर्ज नं. ३०/२०२६
नि.नं. २०/बी

१. योजना अशोक पाटील
व.व. ५७, धंदा घरकाम
रा. देऊळ गल्ली, केखले,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
२. उत्तम रामराव पाटील
व.व.५६, धंदा शेती व नोकरी,
रा. सदर
३.सुनिता यशवंत पाटील
व.व. ५० धंदा शेती व घरकाम
रा. भुयेवाडी ता. करवीर जि. कोल्हापूर ......... अर्जदार
४. सुशांत रामराव पाटील
व.व. ३२, धंदा शेती
रा. हनुमान डेअरी, गणेश रोड केखले
ता. पन्हाळा जि. कोल्हापूर
५.सुजिता रामराव पाटील (लग्नापूर्वीचे नांव)
सुजिता प्रियेश पाटील (लग्नानंतरचे नांव)
व.व. २८ धंदा घरकाम
रा. कर्नाळा ता. मिरज जि. सांगली

विरुध्द

१. कोणीही नाही ......... वि.प.

बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७ VIII चे कलम ७ प्रमाणे
वारसा दाखला (Heirship Certificate) मिळणेसाठी अर्ज

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या न्यायालयाकडे दि. ०७/०५/२०२६ इ. रोजी अर्ज दाखल करुन यातील अर्जदार तर्फे मे. कोर्टाना नम्रपणे कळविणे की, अर्जदार नं. १ ते ५ हे वर नमूद सरनाम्यानुसार त्या ठिकाणी राहणेस असून अर्जदार नं. १ ते ५ हे नात्याने सख्खे भाऊ बहिण आहेत. सदर अर्जदार नं. १ ते ५ यांची आत्ती तानुबाई यशवंत पाटील या दि. ०१/०९/२००४ रोजी राहते घरी म्हणजेच केखले ता. पन्हाळा या गांवी अविवाहीत मयत झालेल्या असून त्यांचे पश्चात त्यांना कायदेशीर वारसदार म्हणून त्यानंतर त्यांना त्यांचे सख्खे भाऊ रामराव यशवंत पाटील हे देखील दि. १४/०९/२०१९ रोजी राहते घरी मयत झालेले आहेत. तसेच त्यांची पत्नी शालाबाई रामराव पाटील या देखील दि. ०१/०१/१९९१ रोजी राहते घरी मयत झालेल्या आहेत. अर्जदार नं. १ ते ५ यांना त्यांचे आई वडील म्हणजेच रामराव यशवंत पाटील व शालाबाई रामराव पाटील हे सन २०१९ साली व सन १९९१ साली मयत झालेले होते. सदर त्यांचे मृत्यूपश्चात अर्जदार नं. १ ते ५ यांचे वडील त्यांची सख्खी बहिण तानुबाई यशवंत पाटील या दि. ०१/०९/२००४ रोजी अविवाहीत म्हणून झालेल्या आहेत. सदर कै. तानुबाई यशवंत पाटील, कै. रामराव यशवंत पाटील, कै. शालाबाई रामराव पाटील यांना अर्जदार नं. १ ते ५ हे कायदेशीर सरळ वारसदार होते व आहेत. सदर रामराव यशवंत पाटील यांची सख्खी बहिण तानुबाई यशवंत पाटील या सुरुवातीपासून अविवाहीत आहेत. त्यांचा कधीही विवाह झालेला नव्हता व नाही. त्यांना कोणतेही कायदेशीर सरळ वारसदार कधीही नव्हते व नाहीत. सदर तानुबाई यशवंत पाटील या अविवाहीत म्हणून दि. ०१/०९/२००४ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे मृत्यूपश्चात त्यांच्या कायदेशीर सर्व अंतिम विधी हा त्यांचे भाऊ रामराव यशवंत पाटील हे वयस्क असलेमुळे अर्जदार नं. २ यांनीच पूर्ण केलेला होता व आहे. मयत कै. तानुबाई यशवंत पाटील या मृत्यूसमयी निपुत्रीक म्हणून मयत झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे मृत्यूच्या अगोदर त्यांचा सांभाळ पालन पोषण दवापाणी औषधउपचार हा देखील अर्जदार नं. १ ते ५ यांनीच केले होते व आहे. सदर मयत कै. तानुबाई यशवंत पाटील यांचे

मृत्यूपश्चात त्यांचा मृत्यूनंतरचा सर्व धार्मिक कार्यविधी या अर्जदार नं. १ ते ५ यांनीच पूर्ण केलेल्या होत्या व आहेत. मयत कै. तानुबाई यशवंत पाटील यांचे त्यांच्या आई वडीलांचे पश्चात मयत रामराव यशवंत पाटील व अर्जदार नं. १ ते ५ यांनी सांभाळ पालन पोषण करत होते. अर्जदार नं. १ ते ५ हेच त्यांचे आधारवड होते व आहेत. सदर अर्जदार नं. १ ते ५ यांच्या व्यतिरीक्त अन्य कोणीही कायदेशीर सरळ वारसदार नसून ते अर्जदार नं. १ ते ५ हेच आहेत. सदर कै. तानुबाई यशवंत पाटील, कै. रामराव यशवंत पाटील, कै. शालाबाई रामराव पाटील यांचे मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारसदार म्हणून लागणा-या शासकीय निमशासकीय या ठिकाणी तसेच इतर अन्य कार्यालयामध्ये कायदेशीर वारसदार कळविलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांना (Heirship Certificate) याची आवश्यकता असलेने त्यावेळी व त्यासुमारास सदर अर्जास कारण घडलेले आहे.

सदरच्या अर्जाबाबत मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अर्जदार यांनी दि.२३/०५/२०२६ इ. रोजी दैनिक नवसंदेश, कोल्हापूर मध्ये वर्तमानपत्रात जाहिरनामा प्रसिध्द केलेला आहे. तसेच त्याच्या प्रती १. मयत कै.तानुबाई यशवंत पाटील रा. देऊळ गल्ली, केखले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील घरावर २. गाव चावडी / ग्रामपंचायत केखले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर ३. नोटीस बोर्ड, दि.न्या.क.स्तर, पन्हाळा येथे प्रसिध्द करणेत आल्या. तथापि त्या जाहिरनाम्याच्या व वर्तमानपत्रातील नोटीसच्या अनुषंगाने कोणीही हरकत अथवा तक्रार दाखल केलेली नाही.

म्हणून मयत कै.तानुबाई यशवंत पाटील यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे साक्षी पुराव्यावरून सिध्द झाल्याने दि.१८/०७/२०२६ इ. रोजीचे आदेशानुसार सदरचा वारसा दाखला अर्जदार यांना देण्यात येत आहे.

अर्जदार यांनी सदर प्रमाणपत्राकरीता आवश्यक असणारा न्यायालयीन शुल्काचा मुद्रांक रु.२००/- जमा केला आहे.

सदर कामी मा.न्यायालयाने पुढीलप्रमाणे आदेश केला आहे.

## आदेश

१. अर्जदार क्र. १ ते ५ यांचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम ८ अन्वये अर्जदार क्र. १ ते ५ यांचे नावे

वारस दाखला देणेत यावा.

३. बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ तसेच दिवाणी नियमावली परिच्छेद क्र.३१२

अन्वये वारस दाखले मध्ये तशी टीप ठेवण्यात यावी.

18/7/26

दि.१८/०७/२०२६

( के.दि.काकतकर )

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर पन्हाळा

आज दि.१८ माहे जुलै सन २०२६ इ. रोजी माझे सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

दिवाणी नियमावलीच्या क्र.१४ च्या परिच्छेद क्र. ३१२ व ३१३ नुसार तळटीप -

या प्रमाणपत्राआधारे मिळालेल्या अथवा ताब्यात आलेली मिळकतींची खरी आणि सविस्तर माहिती प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासून सहा महिन्याच्या आत अथवा मुदतवाढ मिळाल्याच्या तारखेपर्यंत अर्जदारांनी न्यायालयात दाखल करणे आवश्यक आहे. तसेच या प्रमाणपत्राच्या आधारे मिळालेल्या अथवा ताब्यात आलेल्या मिळकतींचा कशा पध्दतीने वापर करण्यात आला अथवा विल्हेवाट लावण्यात आली याबाबतची माहिती देखील प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासून एक वर्षाच्या आत अथवा मुदतवाढ मिळाल्याच्या तारखेपर्यंत अर्जदाराने न्यायालयात दाखल करणे आवश्यक आहे. अशी कोणतीही माहिती न्यायालयास सादर न केल्यास अर्जदार भारतीय दंड विधानाच्या कलम १७६ अन्वये व भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५ मधील कलम ३१७,३९० नुसार कार्यवाहीस पात्र राहील.